# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 18 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १८ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीत वैयक्तिक कायद्यांच्या माध्यमातून अडथळे आणता येणार नाहीत–सर्वोच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती
- विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची राज्य सरकारविरोधात आचारसंहिता भंगाची तक्रार
- ज्येष्ठ संस्कृततज्ज्ञ पंडित वसंतराव गाडगीळ कालवश–पुण्यात अंत्यसंस्कार

आणि

- न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात भारत १२५ धावांनी पिछाडीवर

****

बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीत वैयक्तिक कायद्यांच्या माध्यमातून अडथळे आणता येणार नाहीत, असं सर्वोच्च न्यायालयानं आज स्पष्ट केलं. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या पीठाने आज बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्वंही जारी केली.

****

नागरिकांनी मानवाधिकाराच्या उल्लंघनाविरोधात ठामपणे उभं राहायला हवं, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं भारतीय राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या स्थापना दिन उपराष्ट्रपती धनखड यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला त्यावेळी ते बोलत होते. मानवाधिकार हा देशाच्या नैतिक मूल्यांचाच एक भाग असल्याचं ते म्हणाले.

****

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत भारतीय जनता युवा मोर्चातर्फे सुरू करण्यात आलेल्या 'आयडियाज फॉर विकसित महाराष्ट्र' या अभियानाचा शुभारंभ केला. तरुणांच्या कल्पना, आकांक्षा जाणून घेण्यासाठी हे अभियान सुरू केलं असल्याचं भाजपा प्रदेश सरचिटणीस आणि युवा मोर्चाचे प्रभारी आमदार विक्रांत पाटील यांनी मुंबईत पत्रकारांशी बोलताना सांगितलं. या मोहिमेद्वारे दीड कोटी सूचना गोळा करण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं असून, यासाठी जिल्हा स्तरावर येत्या २५ दिवसात ५० हजारांहून अधिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येणार असल्याचं पाटील यांनी सांगितलं. या अभियानात सूचना पाठवण्यासाठी तसंच अधिक माहितीसाठी संबंधित संकेत स्थळाला भेट देण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप आणि मित्रपक्षांकडून मतदार याद्यांमध्ये फेरफार करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला आहे. या आणि इतर विषयांमध्ये निवडणूक आयोगानं लक्ष घालून कारवाई करावी, या मागणीसाठी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांना आघाडीने पत्र दिलं आहे. या पत्रावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभा तसंच विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि अंबादास दानवे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अनिल देसाई, तसंच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

****

विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्य सरकारविरोधात आचारसंहिता भंगाची तक्रार केली आहे. विधानसभा निवडणुकीची घोषणा होऊन आचारसंहिता लागल्यानंतरही सरकारने आपल्या शासकीय संकेतस्थळावर एका दिवसात २५९ शासन निर्णय प्रसिद्ध केले. तसंच २७ महामंडळांवर अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या. यामुळे आचारसंहितेचा भंग होत असल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे. आचारसंहिता भंग करणाऱ्या या प्रकरणांची चौकशी करण्यात यावी, असं पत्र दानवे यांनी केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त तसंच राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर केलं आहे.

****

युवकांनी स्वतः मतदानाचे महत्त्व ओळखून इतरांनाही मतदानाचं महत्त्व सांगावं असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं. देवगिरी महाविद्यालयात युवासंवाद कार्यक्रमात ते आज बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, स्वीप नोडल अधिकारी दीपाली थावरे, प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांच्यासह प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. युवकांनी स्वयंस्फूर्तीने मतदानासाठी पुढे यावे आणि आपला लोकशाहीचा हक्क बजवावा असं आवाहनही जिल्हाधिकारी स्वामी यांनी केलं. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृतीसाठी पोवाडा आणि गीते सादर केली.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. जिल्ह्यातील ५० टक्के मतदान केंद्रावर वेब कास्टिंग केली जाणार असून मतदारांनी शंभर टक्के मतदान करावं असं आवाहन पाठक यांनी यावेळी केलं. संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रावर पोलिसांचा विशेष बंदोबस्त असणार आहे. गेवराई, माजलगाव, बीड, आष्टी, केज आणि परळी येथील ९६ मतदान केंद्र संवेदनशील असून या मतदान केंद्रावर सीसीटीव्हीच्या माध्यमातून जिल्हा प्रशासनातर्फे लक्ष ठेवले जाणार असल्याचं पाठक यांनी सांगितलं.

****

नांदेड इथं आज नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात मतदान जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ आणि नायब तहसीलदार नितेशकुमार बोलेलू यांनी युवकांशी संवाद साधला. निवडणुकीत उत्साहाने मतदान करुन लोकशाहीचा उत्सव साजरा करावा, असं आवाहन तहसीलदार प्रविण पांडे यांनी यावेळी केलं.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरून प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नंदुरबार आणि धुळे जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

ज्येष्ठ संस्कृततज्ज्ञ पंडित वसंतराव गाडगीळ यांचे आज पुण्यात निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून संस्कृत विषयात पदवीपर्यंतचं अध्ययन केलेले गाडगीळ यांनी, संस्कृत वाङ्मय आणि भारतीय संस्कृतीवर मोठं संशोधन केलं. संस्कृत भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी देशभर आणि परदेशातही अनेकदा प्रवास केला. याच उद्देशाने शारदा ज्ञानपीठाची स्थापना केलेल्या गाडगीळ यांनी संस्कृतशी संबंधित विषयांवर विपुल लेखन केलं. त्यांच्या पार्थिव देहावर आज पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

बंगळुरु इथं भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सुरू असलेल्या क्रिकेट कसोटीत भारत १२५ धावांनी पिछाडीवर आहे. आज न्यूझीलंड संघानं सर्वबाद ४०२ धावा केल्या. आजचा खेळ संपला तेव्हा भारतीय संघाच्या दुसऱ्या डावात तीन बाद २३१ धावा झाल्या होत्या. यशस्वी जैस्वाल ३५, विराट कोहली ७० आणि रोहित शर्मा ५२ धावा केल्या तर सरफराज खान ७० धावांवर खेळत आहे.

****

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या पी व्ही सिंधूचा सामना इंडोनेशियाच्या ग्रगोरिया मारिस्का तुनजुंग हिच्याशी होत आहे. सिंधुनं काल चीनच्या हान यू हिचा १८-२१, २१-१२, २१-१६ असा पराभव केला. इतर सर्व भारतीय खेळाडूंना पहिल्या फेरीतच पराभवाचा सामना करावा लागला.

****

परभणी जिल्ह्यात उद्यापासून ते २१ ऑक्टोबर दरम्यान १४ वर्षे वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांच्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. २७ ते २९ ऑक्टोबर दरम्यान १४, १७ आणि १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धा होणार आहे. क्रीडाप्रेमी आणि खेळाडूंनी या स्पर्धेस उपस्थित राहून खेळाडूना प्रोत्साहन द्यावं असं आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांनी केलं आहे.

****

मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे विद्यमान आमदार सतीश चव्हाण यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आलं आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी याबाबतचं पत्र आज जारी केलं.

****

एमआयएमचे नेते तथा छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी नांदेड लोकसभा पोटनिवडणूक लढवण्याचा मानस व्यक्त केला आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथे प्रसार माध्यमांशी बोलत होते. पक्षश्रेष्ठींनी आदेश दिला तर नांदेड इथून निवडणूक लढवणार असल्याचं, सय्यद इम्तियाज यांनी सांगितलं.

****

आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते माजी नगरसेवक नाना बागुल तसेच सिंधी समाजाचे ज्येष्ठ नेते नंदलाल वाधवा यांनी आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षात प्रवेश केला. आज मुंबई मराठी पत्रकार संघात झालेल्या पत्रकार परिषदेत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी ही घोषणा केली.

****

माजी आमदार राजन तेली यांनी भाजपाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा आणि सावंतवाडी विधानसभा प्रमुख पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपला राजीनामा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठवला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सिल्लोड तालुक्यातले भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी सुरेश बनकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अरुण काळे यांच्यासह सिल्लोड – सोयगांव विधानसभा मतदारसंघातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. आज मुंबईत झालेल्या या प्रवेश सोहळ्यात पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शिवबंधन बांधून या सर्वांचं स्वागत केलं.

****

नांदेड जिल्ह्यात शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पाच्या धरणातील उपलब्ध पाणीसाठ्यातून चालू रब्बी हंगामात नियम आणि अटीनुसार पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक लाभधारकांनी आपले नमुना क्रमांक ७ चे पाणी अर्ज जवळच्या शाखा कार्यालयात १५ नोव्हेंबर पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रासह भरून द्यावेत, असं आवाहन नांदेड पाटबंधारे विभाग उत्तरचे कार्यकारी अभियंता यांनी केलं आहे.

****